# जिल्हा परिषद, गोंदिया

## सामान्य प्रशासन विभाग


जि.प.प्रशासकीय इमारत,आमगांव रोड,गोंदिया-441601

website:-www.zpgondia.gov.in Ph.No.:- 07182 236425

dyceovp_zpgondia@rediffmail.com /dyceovpgondia01@gmail.com


जा.क्र. /जिपगों/साप्रवि/कार्या-१०/व.स./ /२०२६ दिनांक:-

वाचा :- १.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय अकंपा- १२२५/प्र.क्र. १२१/म.लो.आ. दिनांक १७.०७.२०२५.
२.ग्राम विकास विभाग,महा.शासन,शासन निर्णय क्रमांक अकंपा २०२५/प्र.क्र.४४२/आस्था-७ दिनांक ३१.०७.२०२५.

## परिपत्रक :-

जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुबांतील वारस यांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्यासंबंधाने दिनांक ३१.०८.२०२६ अखेरपर्यंत प्राप्त अनुकंपाधारकांची एकूण १५६ प्रकरणांची तात्पुरती प्रतीक्षासूची व संभाव्य नियुक्ती संबंधाने माहिती पूर्ण असलेले गट-क - ७० व गट-ड - ०२ असे एकूण ७२ प्रकरणे असे तीन स्वतंत्र तात्पुरती प्रतीक्षासूची जिल्हा परिषद, गोंदियाचे सूचना फलक / जिल्हा परिषद गोंदियाचे संकेतस्थळावर (www.zpgondia.gov.in) तात्पूरती प्रतीक्षासूची याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तसेच संदर्भीय शासन निर्णय दिनांक १७ जुलै, २०२५ मधील मुद्दा क्र. III (२) नुसार कुटुंबाने इच्छुकता पत्र सादर केल्याच्या दिनांकापासून ३ वर्षाच्या मुदतीत अनुकंपा नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज कार्यालय प्रमुखास सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा कुटुंबीयांचे नाव अनुकंपा यादीतून वगळण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

तसेच ज्या गट क मधील अनूकंपाधारक उमेदवारांना गट-ड मध्ये विकल्प द्यायचा असेल त्यांनी दिनांक ०५.१०.२०२६ सायंकाळी ५.०० पर्यंत सादर करावा.

सदर तात्पुरत्या प्रतिक्षासूचीवर कोणाचे काही आक्षेप असल्यास त्यांनी दिनांक ०५.१०.२०२६ चे सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद गोंदिया येथे कार्यासन-१० कडे पोहोच करावे.

(टिप :-जिल्हा परिषद,गोंदिया अंतर्गत प्रतीक्षासूचीतील सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, प्रतीक्षासूचीतील अनुकंपाधारकांची नेमणूक शैक्षणिक अर्हता व सामाजिक प्रवर्गानुसार समुपदेशन प्रक्रियेद्वारे व पारदर्शकता ठेवून राबविण्यात येणार असल्याने उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला / भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन करण्यात येत आहे. याबाबत कोणीही रकमेची मागणी केल्यास किंवा नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवित असल्यास अनुकंपाधारक उमेदवारांनी खालील भ्रमणध्वनी क्रमांकावर थेट संपर्क साधावा.)

१) श्री. जेनित चंद्रा दोन्तूला (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया.
मो. ९७२४४००३७४

२) श्री. फरेंद्र आर. कुतिरकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, गोंदिया.
मो.९४०४४८१७२१६

(जेनित चंद्रा दोन्तूला.,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया

प्रतिलिपी :-

१. मा. अध्यक्ष/ मा. उपाध्यक्ष, जिल्हा परिषद गोंदिया यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. खाते प्रमुख, जिल्हा परिषद, गोंदिया (सर्व)
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व) यांना माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस अग्रेषित. पूर्ण/अपूर्ण असलेल्या प्रकरणांची तात्पुरती प्रतिक्षा सुची जिल्हा परिषद गोंदियाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली असुन सदर तात्पुरती प्रतिक्षासूची आपले सुचना फलकावर प्रसिद्ध करावी.

## सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परीषद गोंदिया

### गट -ड अनुकंपा प्रतिक्षा यादी.

सामान्य प्रशासन विभाग ,मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक अनुकंपा 1225/प्र.क्र.121/म.लो.आ. दिनांक 17 जुलै 2025 व ग्राम विकास विभाग, महा. शासन , शासन निर्णय क्रमांक अकंपा-2025/प्र.क्र.442/आस्था-7 दिनांक 31.07.2025 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार शासन सेवेत असतांना दिवंगत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत जिल्हा परिषद गोंदियाकडे **उमेदवारांनी सादर केलेल्या गट - ड विकल्पानुसार गट ड संवर्गात अनुकंपा नियुक्तीसाठी** प्रलंबित असलेल्या प्रकरणाची **तात्पुरती प्रतीक्षा यादी वर्ष** 2025 - 26 (प्रकरणाची स्थिती दिनांक 31.08.2026 पर्यंत साप्रवि कार्यालयास प्राप्त प्रस्तावानुसार) प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ. क्रं. | नवीन प्रतिक्षा जेष्ठता सची क्रमाक | जुने प्रतिक्षा जेष्ठता सुची क्रमाक | प्रस्ताव प्राप्त झाल्याचा आवक क्रमाक / दिनांक | मृत कर्मचा-यांचे नांव | मृत्यु दिनांक | नौकरीकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे नांव | मृत कर्मचारी यांचेशी असलेले नाते | मुळ पत्ता | जन्म दिनांक DD//MM/ YYYY | दि.31.08.2025 रोजी असलेले वय | | | शैक्षणिक पात्रता | व्यावसायिक पात्रता | जात | प्रवर्ग | कार्यालयीन अभिप्राय | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | वर्ष | महिने | दिवस | | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 1 | 1/2026 | 324 | 4232/12.08.2011 | मृत श्री.एच.सी. सेउतकर, परिचर, पं.स.सालेकसा | 23.07.2006 | कु. छनू हेमराज सेउतकर | मुलगी | मु. आंमगाव खुर्द, पो.ता.सालेकसा, जि. गोंदिया | 28-05-1990 | 36 | 3 | CLASS | 10 वी पास, 12 वी पास 46.50 % | मराठी-30/ इंग्रजी-30 MSCIT | कलार | इमाव | **मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथील दाखल रिट याचीका क्र. 5300/2023 वरील अंतीम पारित आदेश दिनांक 18.06.2024 अन्वये पुनश्च: यादीमध्ये समावेश.** | पात्र |
| 2 | | | 49/18.05.2026 | मृत श्री.मनोज सुधाकर मेश्राम,आरोग्य सेवक,प्रा.आ.केंद्र ईळदा उपकेंद्र राजोली पं.स.अ/मोर जि.गोंदिया | 05.02.2026 | श्रीमती प्रियंका मनोज मेश्राम | पत्नी | मु.पो.पोहरा ता.लाखनी जि.भंडारा | 13.04.1998 | 28 | 4 | 18 | 10 वी नापास | | नावी | इमाव | | वर्ग-4 करीता विकल्प दिले आहे. |

टिप :- वरील उमेदवाराची यादी ही अनुकंपा रजिष्टर वरुन तयार करण्यांत आली असुन दिनांक31.08.2026 पर्यंत प्राप्त प्रस्ताव अनुकंपा यादीमध्ये समावेश करण्यांत आले आहे. सदरहु यादी मुळ अनुकंपा नोंदवही रजिष्टर नुसार तसेच उमेदवारांनी सादर केलेल्या दस्तऐवज तसेच समंतीपत्र इलफनामे ,प्रमाणपत्र वारसान प्रमाणपत्र तसेच इतर 100/- च्या स्टॅम्प पेपर वर लिहुन दिलेल्या माहितीच्या अधिन राहुन पात्र यादी तयार करण्यात आली असुन चुकीची माहिती सादर केलेली असल्यास यास सबंधीत अनुकंपा उमेदवार हे व्यक्तिश: जबाबदार राहतील. वरील प्रमाणे ऑगष्ट 2026 अखेर अनुकंपा उमेदवारांची तात्पुरती प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच सदर यादीवर काही आक्षेप असल्यास 7 दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, गोंदिया यांच्या नावाने पुराव्यासह सादर करण्यात यावे. विहित मुदतीच्या नंतर आक्षेप / हरकती प्राप्त झाल्यास सदर आक्षेपांचा / हरकतींचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

श्री.व्ही.जे. मडावी,स.प्र.अ.
साप्रवि, जि.प.गोंदिया

श्री.ओ.जे. बिसेन,क.प्र.अ. साप्रवि,
जि.प.गोंदिया

सादरकर्ता श्री. ए.जी. कदम, व.स.
साप्रवि, कार्या-10

( फरेंद्र कुतिरकर )
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (सा.प्र.)
जिल्हा परिषद, गोंदिया

(जेनित चंद्रा दोन्तुला.,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया